८) तसेच डि.जी.ई.टी.नवी दिल्ली व संचालक (प्रशिक्षण) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

९) विद्यमान औद्योगिक प्रशिक्षण केंद्राने अधिकच्या (दुस-या / चौथ्या) तुकड्यांना संलग्नता मिळण्याकरिता सुधारित ट्रेनिंग मॅन्युअल २००२ प्रमाणे ॲनेक्चर ३ व ३ ए तक्त्यांमध्ये माहिती भरुन (स्थानिक स्थायी समितीतर्फे निरीक्षण करुन) अहवाल (DIR) सहसंचालक / उपसंचालक, प्रादेशिक कार्यालय यांचेकडे सादर करण्यांत यावा. त्यांनी पूर्व निरिक्षण अहवाल (PIR) सादर करण्याची आवश्यकता नाही. तथापि नवीन व्यवसाय / तुकडी (पहिली / तिसरी) असल्यास स्थायी समिती निरीक्षण होण्यापूर्वी पूर्वनिरीक्षण अहवाल (PIR) सहसंचालक / उपसंचालक, प्रादेशिक कार्यालयाकडे सादर करण्यांत यावेत.

१०) तसेच संस्थेने संलग्नतेबाबत मानकानुसार पूर्तता केल्याबाबतचे दि.३० एप्रिल,२००९ पूर्वी संबंधित सहसंचालक / उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,प्रादेशिक कार्यालय व जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांना लेखी कळविल्यानंतर आपल्या संस्थेचे तात्काळ पूर्वनिरीक्षण करुन स्थायी समितीचे निरीक्षण करण्यांत येईल व याबाबतीत काही अडचणी निर्माण झाल्यास मार्गदर्शनासाठी संबंधित सहसंचालक / उपसंचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय / जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांचेशी संपर्क साधून निवारण करुन घेण्यात यावें.

११) सध्या सुरु असलेल्या विद्यमान औ.प्र.केंद्रांमध्ये नवीन व्यवसाय / जादा तुकड्या करिता शासन निर्णय क्र.आयटीआय-२००८/रिट/(२७/०८)/व्यशि-२, दि. ३१ मार्च, २००८ नुसार सुधारित प्रशिक्षण शुल्क लागू राहील.

१२) प्रत्येक व्यवसायासाठी व्यवसाय अभ्यासक्रमाची प्रत,लागणारी जागा,ईमारत,यंत्रसामुग्री,टूल कीटस्,विद्युत पुरवठा व कर्मचारी वर्ग इ. बाबतची मानके संबंधित संस्थेस सहसंचालक / उपसंचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय / जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांचे कार्यालयातून उपलब्ध होतील. ही मानके अर्जासोबत असलेल्या माहिती पुस्तिकेतही आहेत. याबाबत सर्व साधन सुविधांची निरीक्षणांसाठी तयारी करण्यात यावी.

आपल्या संस्थेला नवीन व्यवसाय/जादा तुकडीसाठी शिफारस करण्यांत आलेली आहे, अशा व्यवसाय अभ्यासक्रमासाठी मानकानुसार दि.३० एप्रिल,२००९ पूर्वी पूर्व निरीक्षण करुन संबंधित सहसंचालक / उपसंचालक, प्रादेशिक कार्यालय यांचेकडे निरीक्षण अहवाल सादर करण्यांत यावा. तसेच दुस-या / चौथ्या तुकडीकरिता विभागीय निरीक्षण करुन निरीक्षण अहवाल सहसंचालक / उपसंचालक, प्रादेशिक कार्यालय यांचेकडे सादर करण्यांत यावेत.

**परवानगी दिलेले नवीन व्यवसाय / जादा तुकडी**

१) पेंटर जनरल - १ ली तु.
२) जोडारी - २ री तु.
३) विजतंत्री - २ री तु.
४) आरेखक यांत्रिकी - २ री तु.

( ज. द. भुतांगे )
**संचालक (प्रशिःक्षण)**
**व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,**
**महाराष्ट्र राज्य,मुंबई- ४०० ००१.**

प्रत -
१) मा.प्रधान सचिव,उच्च व तंत्रशिक्षण विभाग,मंत्रालय,मुंबई-३२ यांना माहितीस्तव सविनय सादर
२) सहसंचालक/ उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, **पुणे**
३) जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, **कोल्हापूर**